# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar
Date – 08 February 2025
Time 18.10 to 18.20
Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक – ०८ फेब्रुवारी २०२५ सायंकाळी ६.१०**

****

- दिल्ली विधानसभा निवडणुकीत भाजपला स्पष्ट बहुमत–माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल पराभूत
- प्रसारमाध्यमांनी सर्जनशीलपणे काम करण्याची आवश्यकता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडून व्यक्त
- ज्येष्ठ पत्रकार पंढरीनाथ सावंत यांचं मुंबईत राहत्या घरी निधन
- मराठा आरक्षण नेते मनोज जरांगे पाटील यांचा १५ फेब्रुवारीपासून पुन्हा उपोषणाचा इशारा

आणि

- राष्ट्रीय क्रीडा स्पर्धांमध्ये २३ सुवर्णपदकांसह महाराष्ट्राकडून पदकांची शतकपूर्ती

****

दिल्ली विधानसभा निवडणुकीत भारतीय जनता पक्षाला स्पष्ट बहुमत मिळालं आहे. पाच तारखेला झालेल्या या निवडणुकीची आज मतमोजणी झाली, यात भाजपला ४३ जागांवर विजय मिळाला असून, पाच जागांवर भाजपचे उमेदवार आघाडीवर आहेत. सत्ताधारी आम आदमी पक्षाला २१ जागांवर विजय मिळाला असून, एका जागेवर आपचा उमेदवार आघाडीवर आहे. काँग्रेस पक्षाला एकाही जागेवर विजय मिळवता आलेला नाही. नवी दिल्ली मतदार संघातून आम आदमी पक्षाचे प्रमुख माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांचा पराभव झाला. भाजपचे प्रवेश वर्मा यांनी केजरीवाल यांना चार हजार ८९ मतांनी पराभूत केलं. तर जंगपुरा मतदार संघातून आपचे मनीष सिसोदिया यांचा भाजपचे तरविंदरसिंह मारवाह यांनी अवघ्या ६७५

मतांनी पराभव केला. दिल्लीच्या मुख्यमंत्री आतिशी यांनी कालकाजी मतदार संघातून भाजपचे रमेश बिधुडी यांच्यावर तीन हजार ५२१ मतांनी विजय मिळवला.
दरम्यान, २६ वर्षांनंतर पुन्हा एकदा दिल्लीत सत्तेत येत असल्यामुळे भारतीय जनता पक्षात आनंदाचं वातावरण आहे. दिल्लीतल्या भाजपा कार्यालयात कार्यकर्ते फटाके वाजवून आणि मिठाई वाटून विजय साजरा करत आहेत.
पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी हा विकास आणि सुशासनाचा विजय असल्याचं म्हटलं आहे. दिल्लीवासियांच्या सेवेसाठी अधिक सक्षमपणे काम करण्यास कटिबद्ध असल्याचं पंतप्रधानांनी आपल्या ट्विट संदेशात म्हटलं आहे.
दरम्यान, उत्तरप्रदेशात मिल्कीपूर विधानसभा पोटनिवडणुकीत भाजपचे चंद्रभानु पासवान यांनी समाजवादी पार्टीचे अजित प्रसाद यांना ६१ हजाराहून अधिक मतांनी पराभूत केलं.
तमिळनाडूत इरोड विधानसभा पोटनिवडणुकीत द्रविड मुन्नेत्र कळघमचे चंधीरकुमार व्ही सी यांचा विजय निश्चित मानला जात आहे, त्यांनी मतमोजणीच्या १८ पैकी सोळाव्या फेरीअखेर ८१ हजाराहून अधिक मतांची आघाडी घेतली आहे.

****

जागतिक पातळीवर रसायन पुरवठादार देशांमध्ये भारताचं नाव आज आघाडीवर असून भविष्यात या क्षेत्रात भारत जगाचं नेतृत्व करेल, असा विश्वास केंद्रीय रसायनं आणि खतं राज्यमंत्री अनुप्रिया पटेल यांनी व्यक्त केला आहे. त्या आज मुंबईत बेसिक केमिकल्स, कॉस्मेटिक्स अँड डाइज एक्सपोर्ट प्रोमोशन काऊन्सिलच्या ३८व्या निर्यात पुरस्कारांचं वितरण केल्यानंतर बोलत होत्या. भारतीय अर्थव्यवस्थेतलं रसायन उद्योगाचं योगदान मोठं असून या क्षेत्राला चालना देण्यासाठी केंद्र सरकारकडून विविध योजना आणि कार्यक्रम राबवले जात असल्याचं पटेल यांनी सांगितलं. रसायन निर्यात क्षेत्रात उत्तम कामगिरी करणाऱ्या १०१ कंपन्यांच्या प्रतिनिधींना अनुप्रिया पटेल यांच्या हस्ते पुरस्कार देऊन गौरवण्यात आलं.

****

प्रसारमाध्यमांनी सर्जनशील राहून काम करणं आवश्यक आहे, जलदगतीने बातमी देत असताना माहितीच्या मुळाशी जाण्याची, खात्री करून घेण्याची वृत्ती आणि गांभीर्य माध्यमांनी जपले पाहिजे, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. पुणे इथं महाराष्ट्रातील पहिल्या जयपूर डायलॉगच्या डेक्कन समिट कार्यक्रमात ज्येष्ठ

पत्रकार आणि राजकीय विश्लेषक भाऊ तोरसेकर आणि जयपूर डायलॉगचे प्रमुख संजय दीक्षित यांनी फडणवीस यांच्याशी संवाद साधला, त्यावेळी ते बोलत होते. जयपूर डायलॉगच्या चांगल्या कार्यासाठी शासन कायम पाठीशी राहिल, अशी ग्वाही फडणवीस यांनी दिली.

****

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेत अपात्र ठरलेल्या लाभार्थी महिलांना जानेवारी महिन्यापासून सन्मान निधी वितरित केला जाणार नसल्याचं, महिला आणि बालकल्याणमंत्री आदिती तटकरे यांनी सांगितलं आहे. सामाजिक संपर्क माध्यमावरील आपल्या संदेशात तटकरे यांनी ही बाब नमूद केली. मात्र, अपात्र ठरलेल्या लाभार्थी महिलांना जुलै २०२४ ते डिसेंबर २०२४ या काळात वितरित झालेला निधी परत घेतला जाणार नाही, असंही तटकरे यांनी स्पष्ट केलं आहे.

दरम्यान, सरकारने लाभार्थी बहिणींना अपात्र ठरवण्याची कृती म्हणजे लाडक्या बहिणींशी केलेली गद्दारी आहे, अशी टीका महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस समितीचे अध्यक्ष आमदार नाना पटोले यांनी केली आहे. ते आज मुंबई इथं माध्यमांशी बोलत होते.

****

ज्येष्ठ पत्रकार, पंढरीनाथ सावंत यांचं आज पहाटे मुंबईत त्यांच्या राहत्या घरी निधन झालं. ते ९० वर्षांचे होते. प्रबोधनकार ठाकरे यांच्या समग्र वाङ्मयाचं संपादन केलेले सावंत यांना, माहिती आणि जनसंपर्क महासंचालनालय यांचा लोकमान्य टिळक जीवनगौरव पुरस्कार, मुंबई मराठी पत्रकार संघाचा पुढारीकार ग. गो. जाधव पुरस्कार तसंच मंत्रालय आणि विधिमंडळ वार्ताहर संघाचा कृ. पां. सामक जीवनगौरव पुरस्कारानं गौरवण्यात आलं होतं.

निर्भिडता आणि व्यासंग यांचा मिलाफ असलेलं, पत्रकारितेतील मार्गदर्शक व्यक्तिमत्व काळाच्या पडद्याआड गेलं, या शब्दांत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पंढरीनाथ सावंत यांना श्रद्धांजली वाहिली. तर मराठी माणसाचे हक्क, मराठी अस्मितेचं रक्षण, आणि महाराष्ट्राच्या हितरक्षणाला प्राधान्य देणारं व्यक्तिमत्त्व आपण गमावलं, अशा शब्दात उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सावंत यांच्या निधनाबद्दल दु:ख व्यक्त केलं आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सावंत यांच्या कार्याला उजाळा देत, मराठी पत्रकारितेतील तीन पिढ्यांचा दुवा निखळला, या शब्दांत आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत.

****

मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे यांनी येत्या १५ फेब्रुवारीपासून अंतरवाली सराटी इथं पुन्हा आमरण उपोषणाचा इशारा दिला आहे. ते आज अंतरवाली सराटी इथं वार्ताहरांशी बोलत होते. दोन दिवसांमध्ये मराठा समाजबांधवांशी चर्चा करून मुंबईत मोर्चा काढण्याबाबत निर्णयही घेतला जाईल, असंही जरांगे यांनी सांगितलं. सरकारसोबतच्या लढाईला आम्ही सज्ज आहेत. यापूर्वीचं सातवं आमरण उपोषण स्थगित करताना चार मागण्या तत्काळ मंजूर करण्यात येतील, असं आमदार सुरेश धस यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी चर्चा करून सांगितलं होत. मात्र, पंधरा दिवस होऊनही काहीच निर्णय झाला नसल्याकडे जरांगे यांनी लक्ष वेधलं.

****

ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते बाबा आमटे आणि साधना आमटे यांच्या रूपाने आपण सर्वांनी देव पाहिला आहे, असं सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती भूषण गवई यांनी म्हटलं आहे. बाबा आमटे यांच्या आनंदवन प्रकल्पाच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त आनंदवन इथं दोन दिवसीय मित्रमेळाव्यात ते आज बोलत होते. आज सकाळी वृक्षदिंडीने मुख्य कार्यक्रमाची सुरुवात झाली. या निमित्ताने अनेक कार्यक्रम, परिसंवाद तसंच चर्चा होणार आहेत.

****

शेतकऱ्यांना कृषीक्षेत्रात काळानुरूप होणारे बदल आता स्वीकारावे लागणार आहेत, असं प्रतिपादन जलसंपदामंत्री तथा अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी केलं आहे. राहाता तालुक्यातील राजुरी इथं घेण्यात येत असलेल्या 'डाळींब बहार मेळावा' आणि 'कृषी प्रदर्शनाच्या' उद्घाटनप्रसंगी विखे पाटील बोलत होते. सेंद्रिय शेतीला चालना देण्यासाठी केंद्र आणि राज्य शासनाचं धोरण उपयुक्त ठरेल, असा विश्वास विखे पाटील यांनी व्यक्त केला.

****

मराठवाड्यात सर्व जिल्हा परिषद कार्यालयांनी शंभर दिवसाच्या कार्यक्रमांतर्गत लोकाभिमुख, पारदर्शक आणि गतिशील प्रशासन राबवून आवास योजना, लखपती दीदी योजनेचे उद्दिष्ट पूर्ण करावेत, असे निर्देश राज्याचे ग्रामविकास आणि पंचायतराज मंत्री जयकुमार गोरे यांनी दिले आहेत. ते आज छत्रपती संभाजी नगर इथं ग्रामविकास पंचायत राज विभागाच्या आढावा बैठकीत बोलत होते. जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेअंतर्गत उमेदमार्फत बचत गटातून उत्पादित झालेल्या वस्तूचे

प्रदर्शन आणि विक्रीसाठी प्रत्येक जिल्ह्यात जिल्हा परिषदेच्या हक्काच्या ठिकाणी उमेद मॉल उभारण्यात येणार असल्याचं गोरे यांनी सांगितलं, ते म्हणाले –

***महिला आता खाद्य पदार्थांच्या पलिकडे जाऊन बचतगटाच्या माध्यमातून खूप चांगले प्रॉडक्टस् बनवतायत आणि खूप चांगलं मार्केटींग करतायत. त्याही संदर्भात आम्ही आढावा घेतला. आणि सरसच्या माध्यमातून जिल्ह्याला आम्ही एक्झिबिशेन घेतो आणि त्यातून महिलांच्या उत्पादनाला मार्केट तयार करून देतो. आणि चार दिवसाच्या त्या कार्यक्रमामध्ये किमान पन्नास, साठ, सत्तर लाखाचं महिलांच्या तयार केलेल्या उत्पन्नाचं मार्केटींग होतं. आणि त्यातून महिलांना उत्पन्न मिळतं. आणि हा विषय आम्ही बघितल्यानंतर एक लक्षात आलं, त्या महिलांना जर कायम स्वरूपी मार्केट आपण तयार करून दिलं, सुरवातीला जिल्हा लेव्हलला. यातून खूप महिलांना स्वतःच्या पायावर उभं राहता येईल. म्हणून आम्ही प्रत्येक जिल्ह्याला एक उमेद मॉल बांधण्याचा नव्यानं सकल्प केलेला आहे.***

****

उत्तराखंडमध्ये सुरू असलेल्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धांमध्ये महाराष्ट्राने पदकांची शंभरी पार केली आहे. महाराष्ट्राकडे सर्वाधिक १०७ पदकं असून त्यात २३ सुवर्ण, ३९ रौप्य आणि ४५ कांस्य पदकांचा समावेश आहे. महिला मुष्टियुद्धात महाराष्ट्राच्या दिव्या पवारनं ४५ किलो वजनी गटात सुवर्णपदक पटकावलं. तर उत्तराखंडच्या निवेदिता कार्कीनं लाईट फ्लायवेट प्रकारात सुवर्ण पदक मिळवलं. महिलांच्या सांघिक टेनिसच्या अंतिम फेरीत, महाराष्ट्राने गुजरातवर विजय मिळवत सुवर्णपदक जिंकलं, तर पुरुषांच्या सांघिक स्पर्धेत, तामिळनाडूनं कर्नाटकला हरवून अव्वल स्थान पटकावलं. पुरूषांच्या फुटबॉलच्या अंतिम सामन्यात केरळने उत्तराखंडचा पराभव करत सुवर्ण पदकाला गवसणी घातली.

****

ताणतणाव कमी करण्यासाठी क्रीडा स्पर्धा अत्यंत महत्त्वाच्या आहेत, असं प्रतिपादन सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी केलं आहे. पुणे महसूल क्रीडा आणि सांस्कृतिक स्पर्धांच्या उद्घाटन प्रसंगी ते आज सातारा इथं

बोलत होते. मदत आणि पुनर्वसन मंत्री मकरंद पाटील, विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, यांच्यासह अनेक कर्मचारी यावेळी उपस्थित होते.

****